# :: प्रेस नोट ::

दि. ०२/०६/२०२१

आरोपी लोकसेवक - श्री. दत्तात्रय लक्ष्मण दिंडकर, वय ४० वर्ष, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क , विभाग बीड , वर्ग- २, यांना ५००००/- ( पन्नास हजार रुपये) लाच स्विकारल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांचेकडुन कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड. |
| पोलीस स्टेशन | पोलीस ठाणे शिवाजी नगर बीड. |
| गुन्हा नोंद कलम | कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्री. दत्तात्रय लक्ष्मण दिंडकर, वय ४० वर्ष, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विभाग बीड , वर्ग- २, |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००००/- ( पन्नास हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती | दिनांक ३१/०५/२०२१ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे विरुध्द दाखल असणारे गुन्हयामध्ये मदत करुन त्यांचे नाव गुन्हयामधून कमी करणेसाठी श्री.दिंडकर , निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग बीड हे ७५०००/- रुपयाची मागणी करत आहेत तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३१/०५/२०२१ रोजी पंचा समक्ष पडताळणी केली असता लोकसेवक श्री. दत्तात्रय दिंडकर यांनी ७५०००/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती ५०००० /- रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्यावरून आज दिनांक ०२.०६.२०२१ रोजी सापळा लावला असता श्री. दत्तात्रय लक्ष्मण दिंडकर, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क , विभाग बीड , वर्ग- २, यांना त्यांचे कार्यालयात ,राज्य उत्पादन शुल्क कार्यालय बीड येथे पंचासमक्ष ५००००/- रुपये लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे .<br>आलोसे श्री. दत्तात्रय लक्ष्मण दिंडकर, वय ४० वर्ष, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क , विभाग बीड , वर्ग- २ यांचे विरुध्द पोलीस ठाणे शिवाजी नगर,बीड येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.डॉ.राहुल खाडे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, श्री.मारुती पंडीत, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, श्री. ब्रम्हदेव गावडे, पोलीस उप-अधीक्षक,औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.विकास घनवट, व पोलीस अमंलदार मिलींद इप्पर, रविंद्र काळे, भुषण देसाई व चालक अमंलदार चंद्रकांत शिंदे,ला.प्र.वि.औरंगाबाद युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड |
| संकेतस्थळ | :-**acbwebmail@mahapolice.gov.in** |
| ई-मेल | :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**<br>2) **dyspacbbeed@gmail.com** |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- **acbmaharashtra.net** |
| टोल फ्रि कमांक | :- १०६४ |
| दुरध्वनी कमांक | :-०२४४२-२२२६४९ |
| व्हॉटस अप क. | :-९९३०९९७७०० |
| पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद | :- ८८८८८०७२९९ |
| अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद | :- ९८८११००८१२३ |
| पोलीस उप अधीक्षक,लापवि,बीड | :- ९१५८६३२६२६ |

२/६/२१

( बाळकृष्ण हनपुडे पाटील)
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.